मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२





# तर महापालिका शाळेचा दर्जा उंचावण्यासोबतच विद्यार्थ्यांची पटसंख्याही वाढेल ; आयुक्तांचा विश्वास

## विद्यार्थ्यांना रोज शाळेत येण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

शाळा व्यवस्थापन समितीचे काम उत्तम पद्धतीने होण्यासाठी विविध माध्यमांचा प्रभावी वापर करून पालक, मुख्याध्यापक आणि विद्यार्थी यांचा समन्वय वाढण्यावर भर द्यावा. या माध्यमातून निश्चितपणे शाळेचा दर्जा उंचावण्यासोबतच विद्यार्थ्यांची पटसंख्याही वाढेल, असा विश्वास आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केला.

महापालिकेच्या वतीने प्राथमिक आणि माध्यमिक शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, अधिकारी तसेच पालक यांच्या मेळाव्याचे आयोजन चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये करण्यात आले होते यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त सिंह बोलत होते.




या मेळाव्यास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, शिक्षणाधिकारी संजय नाईकडे तसेच प्रमुख वक्ते म्हणून भौतिकशास्त्रज्ञ डॉ. दिनेश नेहेते आणि शाळा व्यवस्थापन समितीचे प्रतिनिधी, महापालिका शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकांनी आणि मुख्याध्यापकांनी समन्वय साधून याकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे तसेच विद्यार्थ्यांना रोज शाळेत येण्यासाठी कसे प्रोत्साहन देण्यात येईल किंवा कोणकोणत्या उपाययोजना राबविण्यात येतील याच्यावरही काम केले पाहिजे.मुख्याध्यापकांना आणि शिक्षकांना महापालिका चांगल्या नियोजनासाठी सहाय्य करत असते. व्यवस्थापन समिती किंवा पालकांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार करून याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीने व्हॉट्स ऍप ग्रुपद्वारे किंवा मेसेजद्वारे पालकांपर्यंत सुचना पोहोचविल्या पाहिजेत.

एखाद्या विद्यार्थ्याची हजेरी ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे तर याबाबत त्याच्या पालकांकडे वारंवार चौकशी केली पाहिजे. जर संपर्क झाला नाही तर त्या विद्यार्थ्याच्या घरी जाऊन पालकांना किंवा विद्यार्थ्याला येणाऱ्या समस्या तुम्ही जाणून घेतल्या पाहिजेत. पालकांनीही कामातून वेळ काढून आपल्या पाल्याला विश्वासात घेऊन त्यांच्या भविष्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे.

विद्यार्थ्याचा अभ्यास, आरोग्य, शारिरिक, सर्वांगीण प्रगतीबाबत पालकांनी संवाद साधला पाहिजे. व्यवस्थापन समिती आणि (झळाॅिळ) शिक्षकांचीही त्यामध्ये महत्वाची भूमिका आहे. आपला केंद्रबिंदू हा आपल्या शाळेतील विद्यार्थी आहे ज्याला आपल्याला घडवायचं आहे या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत, असेही आयुक्त सिंह यावेळी म्हणाले.

प्रमुख वक्ते डॉ. दिनेश नेहेते 'मुलांच्या विकासात पालकांची भूमिका' या विषयावर बोलताना म्हणाले, पालक आपल्या पाल्याला शाळेतील वातावरण सुरक्षित असते यासाठी पाठवतात पण घरातील किंवा घराच्या आजूबाजूचे वातावरणही तितकेच सुरक्षित असणे गरजेचे आहे.

मुलांना ज्या गोष्टी माहिती नाहीयेत त्या गोष्टींबद्दल त्यांना अवगत करून देणे महत्वाचे आहे आणि ही शिक्षकांसोबत पालकांचीही जबाबदारी असून पालकत्वाचे काही टप्पे आहेत जे समजून घेणे महत्वाचे आहे. कामाच्या व्यापातून मुलांना वेळ कसा देणार ही प्रत्येक पालकाची तक्रार असते पण जोपर्यंत तुम्ही आपल्या पाल्यांना वेळ देणार नाही, त्यांना प्रेम करणार नाही, शाळेत काय शिकविले याबद्दल रोज विचारपूस करणार नाही तोपर्यंत त्यांच्यामध्ये अभ्यासाची आवड निर्माण होणार नाही. पालकांनी जर रोज ही गोष्ट केली तर तुमच्या पाल्याची आपोआप प्रगती होईल.

पालकांनी आपल्या पाल्यांना जसं आहे तसं स्विकारलं पाहिजे. जर मुले पालकांचे ऐकत नसतील तर कुठेतरी पालकांचे प्रेम कमी पडत आहे. पालकांनी पाल्यांना शाळेतील स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे तसेच स्पर्धेत जरी तो पराभूत झाला तरी स्पर्धे तून त्याला काय शिकायला मिळाले याबद्दलही पालकांनी आपल्या पाल्याची विचारपूस केली पाहिजे, असेही डॉ. नेहेते यावेळी म्हणाले.

# पिंपरी-चिंचवड शहरात ६३ ठिकाणी हॉकर्स झोन निश्चित!

## फेरीवाला समिती बैठकीत महापलिका आयुक्तांची मंजुरी

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड शहरात विविध ६३ ठिकाणी हॉकर्स झोन निश्चित करण्यात आले आहेत. तेथे तब्बल ४ हजार १९४ विक्रेत्यांना व्यवसाय करता येणार आहे. शहर फेरीवाला समितीच्या बैठकीत समितीचे अध्यक्ष तथा महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी त्यास मंजुरी दिली आहे. महापालिकेत नुकत्याच झालेल्या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, भूमी व जिंदगी विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार सरनाईक व क्षेत्रीय अधिकारी तसेच, शहर फेरीवाला समितीचे सदस्य उपस्थित होते. या बैठकीमध्ये शहरांमधील विविध भागांमध्ये जे फेरीवाले व्यवसाय करत आहेत, त्यांच्यासाठी त्याच



भागांमध्ये हॉकर्स झोन किंवा फेरीवाले क्षेत्र निर्माण करण्याचे ठरविले आहे. ज्या भागात जास्त प्रमाणात रहदारीस अडथळा निर्माण होतो, अशा ठिकाणी प्राधान्याने हॉकर्स झोन निर्माण करण्यात येणार आहे. तेथील रस्ते व चौक मोकळे करण्यात येणार आहेत. फेरीवाल्यांमुळे रहदारीस अडचणी निर्माण होते. तसेच, पदपथावर अतिक्रमण झाल्याने फेरीवाल्यांवर अतिक्रमण विभागामार्फत कारवाई होते, अशा फेरीवाल्यांना यामुळे दिलासा मिळणार आहे. हॉकर्स झोनमध्ये शहरातील अधिकृत फेरीवाले यांना क्षेत्रीय अधिकारी, अतिक्रमण विभाग व विविध फेरीवाला संघटना यांच्या समन्वयातून जागा वाटप करण्यात येणार आहे. फेरीवाल्यांसाठी जागेचे भाडे निश्चित करण्यात आले आहे.. जागेचे भाडे दिल्यानंतर फेरीवाल्याला त्या जागेचा वापर करता येणार आहे, सहाय्यक आयुक्त विजयकुमार सरनाईक यांनी सांगितले.

# सरकारने नऊ वर्षात शेतकऱ्यांसाठी काय केले?

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा सवाल



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मागील नऊ वर्षांत केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी काहीच केले नाही. स्वामीनाथन आयोग लागू केला नाही. शेतमालाला योग्य हमीभाव दिला नाही. शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. कापूस, सोयाबीन, मूग, तूर कोणत्याही शेतीमालाला भाव नाही.

नऊ वर्षे केंद्र सरकारने काय दिवे लावले. शेतकऱ्यांसाठी काय केले याचे उत्तर दिले पाहिजे, असे आव्हान विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिले. महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाला (वायसीएम) दानवे यांनी शुक्रवारी भेट दिली. अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांच्याकडून रुग्णालयाची माहिती घेतली. ठाकरे गटाचे शहरप्रमुख सचिन भोसले, जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यावेळी उपस्थित होते.

दानवे म्हणाले, की मराठा समाजाला आरक्षण देण्याची जुनी मागणी आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाने मागणीला नवी धार आली आहे. सरकारने मराठा समाजातील तरुणांचा अंत पाहू नये. आरक्षण मिळाले पाहिजे, या भूमिकेतून सर्व जाती-धर्मांचे लोक मराठा समाजाच्या पाठीशी उभे राहिले आहेत. यासाठी केंद्र सरकारने घटना दुरुस्ती करून आरक्षणासाठीची ५० टक्क्यांची मर्यादा वाढविली, तर आरक्षणाचा लाभ मिळू शकतो.

दिल्लीतील प्रशासकीय अधिकारी नियुक्तीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर केंद्र सरकारने ज्या पद्धतीने कायदा बनविला. संसदेत मंजूर करवून घेतला. त्याच पद्धतीची भूमिका मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत केंद्र सरकारने घेतली पाहिजे. राज्याच्या दौऱ्यावर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आरक्षणाच्या धगधगत्या प्रश्नावर कोणतेही भाष्य केले नाही, त्याकडे दुर्लक्ष केले हे दुर्दैवी आहे, असेही दानवे म्हणाले. कोणतीही महापालिका एवढे मोठे रुग्णालय चालविण्याचे धाडस करत नाही. पिंपरी महापालिकेने ७५० खाटांचे रुग्णालय चालविण्याचे धाडस केले, हे कौतुकास्पद आहे. काही कमतरता आहेत. त्यात सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

गरीब रुग्णांना एमआरआयसाठी अधिकचे पैसे देणे परवडत नाही. त्यामुळे महापालिकेने सवलत द्यावी. या रुग्णालयात जनहिताला प्राधान्य दिले पाहिजे. त्यास प्राधान्य दिले जात नसेल तर कारवाई करावी, असेही ते म्हणाले.

# खेळाडू घडविण्यासाठी आ. महेश लांडगे यांचा पुढाकार!

## रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळास कबड्डी मॅट सुपूर्द



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** खेळाडूंच्या आणि कलाकारांच्या बाबतीत भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांचे नेहमीच विशेष सहकार्य लाभले आहे. विद्यार्थ्यांनी केवळ बौद्धिकदृष्ट्या गुणवान न होता शारीरिक दृष्ट्या सुद्धा सदृढ होणे गरजेचे आहे. शहरात दर्जेदार खेळाडू घडावेत. यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांचा सकारात्मक पुढाकार असतो, असे मत माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांनी व्यक्त केले. रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्ञानदीप माध्यमिक व सौ. अनुसया वाढोकार उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये पुणे जिल्हा क्रीडा अधिकार्यांच्या वतीने व भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या विशेष सहकार्यातून विद्यार्थ्यांसाठी 'इनडोअर' कबड्डी खेळण्यासाठी कबड्डी मॅट प्रदान करण्यात आले. या वेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे खजिनदार भागवत चौधरी, समन्वय समितीचे अध्यक्ष संपत भालेकर, धनंजय वर्णे कर, रमेश भालेकर, अस्मिता भालेकर, अनिल भालेकर, सचिव सूर्यकांत भसे, रामदास कुटे, ज्ञानेश्वर भालेकर, प्राचार्य सुबोध गलांडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था समन्वय समितीचे अध्यक्ष संपत भालेकर होते. प्रास्ताविकात संस्थेचे सचिव सूर्यकांत भसे सर म्हणाले की, संस्थेला क्रीडा क्षेत्रामध्ये नावलौकिक करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. मुलांसाठी चांगले मैदान आहे. खेळाचे साहित्यही उपलब्ध करून दिले जाईल. परंतु त्याचा सर्व विद्यार्थ्यांनी आवश्य लाभ घेतला पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संपत भालेकर यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्त केले. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य सुबोध गलांडे यांनी सर्वांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी संस्थेला आमदार महेश लांडगे यांनी विशेष सहकार्य केल्याबद्दल त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

### खेळाडून निर्माण व्हावे : भालेकर

**» शाळेसाठी लागणार्या आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांचे सदैव सहकार्य लाभणार आहे. ओपन जीमसाठी लागणारे साहित्य, लॉज बॉल साठी लागणारे मैदान, तसेच गुणवान विद्यार्थ्यांच्या विकासासाठी लागणार्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी संस्थेला आवश्यक असणारे सर्व प्रकारचे सहकार्य केले जात आहे. शाळेची गुणवत्ता अत्यंत चांगली असल्यामुळे या संस्थेतून अतिशय गुणवंत खेळाडू ही निर्माण झाले पाहिजे, अशी अपेक्षाही माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांनी व्यक्त केली.**

# पुणे : स्वच्छ एटीएम केंद्र कचऱ्यात!

## बंद पडलेल्या केंद्रांना मुदतवाढ देण्याचा महापालिकेचा घाट

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

प्लास्टिक बाटल्या, शीतपेयांचे धातूचे कॅन्स, प्लास्टिकची वेष्टणे यांचा पुनर्वापर करण्यासाठी मोठा गाजावाजा करून उभारण्यात आलेली ‘स्वच्छ एटीएम केंद्र’ कचऱ्यात गेली आहेत. शहराच्या विविध भागांत बसविण्यात आलेली स्वच्छ एटीएम बंद पडली असतानाही या स्वच्छ एटीएम केंद्रांना मुदतवाढ देण्यात आली आहे. शहरातील प्लास्टिकच्या वस्तूंचा वाढता वापर लक्षात घेता पुनर्वापर आणि विघटनासाठी स्वच्छ एटीएम ही संकल्पना पुढे आली. दिल्ली येथील नोएडाच्या धर्तीवर शहराच्या विविध भागांत अशी एटीएम बसविण्याचे निश्चित करण्यात आले. महापालिकेच्या स्थायी समितीनेही या प्रस्तावाला तातडीने मंजुरी दिली होती. पहिल्या टप्प्यात ४० ठिकाणी स्वच्छ एटीएम बसविण्याचे नियोजित असताना प्रायोगिक तत्त्वावर केवळ नऊ ठिकाणी ती बसविण्यात आली. मात्र योजनेची प्रसिद्धी आणि प्रचार योग्य प्रकारे न झाल्याने स्वच्छ एटीएम बंद असल्याची वस्तुस्थिती पुढे आली होती. त्यात एटीएम या नावामुळे त्यातून पैसे मिळतील, या शक्यतेने एटीएमची चोरट्यांकडून फोडाफोडीही झाली होती. एटीएम वापराअभावी बंद असल्याने आणि त्यांची




दुरवस्था झाल्यानंतरही ठेकेदाराला मुदतवाढ देण्याचा घाट महा पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने घातला आहे. संबंधित कंपनीने एटीएमसाठी सुरक्षारक्षक पुरवावेत आणि त्याची देखभाल दुरुस्ती करावी तसेच एटीएमवर जाहिरात करण्यासाठी आकाशचिन्ह विभागाकडून परवानगी घ्यावी आणि उत्पन्न मिळवावे, या केंद्रांसाठी महापालिकेकडून वीज दिली जात आहे. त्याची रक्कम कंपनीने भरावी, अशी सूचना महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून ठेकेदाराला करण्यात आली होती. मात्र त्यानंतरही ठेकेदाराकडून कोणत्याही ठोस उपाययोजना करण्यात

> “ शहरातील तीन स्वच्छ एटीएम केंद्र कार्यान्वित आहेत. दोन केंद्रांना वीज जोडण्याची प्रक्रिया सुरू आहे. उर्वरित केंद्रांचा आढावा घेतला जाईल.
> – संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग

आल्या नाहीत. मात्र त्यानंतरही या स्वच्छ एटीएमला महापालिकेने फेब्रुवारी महिन्यात तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. ही मुदत संपल्यानंतर पुन्हा मुदतवाढीचा घाट घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून घालण्यात आला आहे.

दिल्ली येथील नोएडाच्या धर्तीवर ही योजना सुरू करण्यात आली होती. प्लास्टिकच्या बाटल्या, वेष्टणे आणि शीतपेयांच्या धातूचे कॅन रस्त्याच्या कडेला किंवा कचऱ्यात टाकून दिल्या जात असल्याने पर्यावरणाला धोका निर्माण होत असल्याने तो टाळण्यासाठी स्वच्छ एटीएम केंद्रात प्लास्टिकच्या बाटल्या, धातूचे कॅन देणाऱ्याच्या बँक खात्यात काही रक्कम जमा होत होती. भ्रमणध्वनी दिल्यानंतर ही रक्कम ऑनलाइन पद्धतीने जमा करण्याची सुविधा यामध्ये होती. मिळणारी रक्कम मोठी नसली तरी प्लास्टिक कचरा रोखला जाण्याच्या हेतूने ही सुविधा सुरू करण्यात आली होती.

# आंद्रा प्रकल्पाच्या पाण्यासाठी चिखली ग्रामस्थ एकवटले!

## चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून स्वतंत्र पाणी उपसा पंप

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

चिखली आणि परिसरातील सुमारे ९० हजार नागरिकांच्या पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून थेट पाईपद्वारे पाटीलनगर येथील जलकुंभात पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र पंप बसवण्यात आला आहे. त्याचे लोकार्पण आमदार महेश लांडगे व समस्थ ग्रामस्थ चिखली यांच्या हस्ते करण्यात आले. या निमित्ताने चिखलीतील ग्रामस्थ एकवटल्याचे चित्र पहायला मिळाले.

आंद्रा प्रकल्पातील १०० एमएलडी पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी चिखली येथे महापालिका प्रशासनाने जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. या केंद्रातून पिंपरी-



चिंचवडसह समाविष्ट गावांना पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. मात्र, चिखलीला आणि परिसराला या प्रकल्पातून पाणी देण्यात येणार नाही, असा दावा काही लोकांनी केला होता.

आता प्रशासनाने आंद्रा प्रकल्पातील पाण्यासाठी चिखली येथे नवीन जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. त्यातील पाणी पाटीलनगर येथील पाण्याच्या टाकीत आणण्यासाठी ६०० एमएम पाईपलाईन टाकली आहे. त्यासाठी स्वतंत्र पाणी उपसा पंपही कार्यान्वीत केला आहे. विशेष म्हणजे, आंद्रा प्रकल्पाच्या अध्यादेशातच चिखली गावचा समावेश असल्यामुळे चिखलीला पाणी पुरवठ्यापासून वंचित ठेवण्यात येईल हे मिथक होते. यावर शिक्कामोर्तब झाले आहे. चिखली व परिसरातील पाणी पुरवठ्यावरुन राजकारण पेटले असताना मात्र, चिखली ग्रामस्थांनी एकोप्याचा संदेश दिला. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आंद्रा प्रकल्पातील पाण्यासाठी स्वतंत्र पंपचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेवक सुरेश म्हेत्रे, कुंदन गायकवाड, सुनिल लोखंडे, दिनेश यादव, स्वीनल म्हेत्रे, सुरेश म्हेत्रे, साधना मळेकर, गिताराम मोरे, अश्विनी जाधव, सामाजिक कार्यकर्ते विनायक आबा

### पाणी पुरवठा होणार सक्षम: मोरे

» आंद्रा प्रकल्पातून अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यामुळे पाण्याची टाकी भरण्यास मदत होईल. टाकीसाठी सध्या एक पंप आहे. आणखी एक पंप उपलब्ध करण्याबाबत प्रशासन प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त पाणीसाठा होण्यास मदत होईल. चिखली गावठाण, रामदासनगर, नागेश्वर विद्यालय, रामदास नगर टप्पा, महादेवनगर, भांगरे कॉलनी, शेलारवस्ती, पाटीलनगर, देहू-आळंदी रस्ता, राम मंदिर डिफेन्स कॉलनी या भागातील पाणी पुरवठा सक्षम होणार आहे, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते विनायक आबा मोरे यांनी दिली.

मोरे, सोनम मोरे, अंकुश मळेकर, अमृत सोनवणे, यशवंत साने, पांडाभाऊ साने, निलेश नेवाळे, किसन बावकर, प्रदीप आहेर, विष्णू मोरे, फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, जितेंद्र यादव, निलेश लोखंडे, नवीन बग, संतोष वाघरे, संदीप शेलार, संतोष जाधव, दत्ता मोरे, गणेश भुजबळ, अविनाश मोरे, संदीप नेवाळे, तुकाराम जाधव, सदाशिव नेवाळे, सविता दाते, किर्ती मोरे, प्रतिभा चौधरी, हेमलता सोनवणे, मनिषा ठोंबरे, कार्यकारी अभियंता रामनाथ टकले, मीनल दौंडल अभियंता रमेश जिंतीकर, सोसायटींचे चेअरमन, प्रतिनिधी आदी उपस्थित होते. ग्रामस्थांनी आंद्रा प्रकल्पाबाबत समाधान व्यक्त केले.

# ललित पाटीलचा एन्काऊंटर होऊ शकतो!

## ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारेंचा गंभीर आरोप

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

नाशिकसह राज्यभर ड्रग्ज तस्करी केल्याचा आरोपी ललित पाटीलचा एन्काऊंटर होऊ शकतो, असा गंभीर आरोप शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. तसेच सध्या कशावरच विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती नाही, असंही सुषमा अंधारे यांनी नमूद केलं. यावेळी सुषमा अंधारे यांनी ससूनचे डीन संजीव ठाकूर यांच्यावरही गंभीर आरोप केले.

सुषमा अंधारे म्हणाल्या, गेल्या दीड महिन्यापासून आम्ही ललित पाटील







प्रकरणाचा पाठपुरावा करत आहोत. यात राज्याच्या तरुणांना, त्यांच्या भविष्याला वाचवणं हा हेतू आहे. ससूनसारख्या ठिकाणी २ कोटी रुपयांचे ड्रग्ज सापडणे ही अत्यंत चिंताजनक, धक्कादायक आणि गंभीर गोष्ट आहे. त्यामुळे ससूनमधील काही लोकांची चौकशी होणं गरजेचं आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ससूनचे डीन संजीव ठाकूर यांना काय घडलं होतं हे विचारलं पाहिजे. एखादा कैदी रुग्ण रुग्णालयात येत असेल, तर कारागृह अधीक्षक आणि त्यांच्या अखत्यारीतील अधिकाऱ्यांकडून आधीच माहिती येत असेल. ती माहिती डीनकडे आणि तेथून वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे जात असेल. त्यामुळे या सगळ्या लोकांची चौकशी झाली पाहिजे, असं मत सुषमा अंधारे यांनी व्यक्त केलं. सुषमा अंधारे पुढे म्हणाल्या, ससूनच्या डीनची चौकशी व्हावी असं आम्ही खूप आधीपासून सांगत होतो. आता तर त्या म्हणण्यावर शिक्कामोर्तब झालं आहे. वार्ड क्रमांक १६ मध्ये ललित पाटीलवर उपचार करणारे डॉक्टर संजीव ठाकूर आहेत. ललित पाटीलचा एन्काऊंटर होऊ शकतो किंवा संशयास्पद मृत्यू होऊन हा तपास थांबवला जाईल. सध्या कशावरच विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती नाही. त्यामुळे या प्रकरणात ललित पाटीलच्या जीवाचं रक्षण हेही एक मोठं आव्हान असेल, अशी भितीही सुषमा अंधारे यांनी व्यक्त केली.

### चौकशी झाली पाहिजे

» सर्वात महत्त्वाचे म्हणजे ससूनचे डीन संजीव ठाकूर यांना काय घडलं होतं हे विचारलं पाहिजे. एखादा कैदी रुग्ण रुग्णालयात येत असेल, तर कारागृह अधीक्षक आणि त्यांच्या अखत्यारीतील अधिकाऱ्यांकडून आधीच माहिती येत असेल. ती माहिती डीनकडे आणि तेथून वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे जात असेल. त्यामुळे या सगळ्या लोकांची चौकशी झाली पाहिजे, असं मत सुषमा अंधारे यांनी व्यक्त केलं.

# राष्ट्रवादीच्या मेळाव्याला धनंजय मुंडेंनी येणे टाळले!

## मराठा क्रांती मोर्चाच्या बंदी पडसाद

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत. तर मराठा आरक्षणाची मागणी मान्य होत नाही. तोपर्यंत राज्यातील अनेक गावांमध्ये मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकानी राजकीय नेत्यांना बंदी घातली आहे. त्याचे पडसाद अनेक ठिकाणी उमटण्यास सुरुवात झाली आहे. त्या सर्व घडामोडी दरम्यान पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मंत्री धनंजय मुंडे यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मात्र सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन धनंजय मुंडे यांनी मेळाव्याला येण्याचं टाळलं.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे




पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी शुक्रवार पेठेतील श्री शिवाजी मराठा हायस्कूलच्या मैदानावर युवकांचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे उपस्थित राहून कार्यकर्त्यांना नियुक्तीचे पत्र देणार होते. त्या पार्श्वभूमीवर जोरदार तयारी करण्यात आली होती. या कार्यक्रमाच्या ठिकाणी सायंकाळी सहा वाजल्यापासून कार्यकर्त्यांनी जमण्यास सुरुवात केली होती. तर या कार्यक्रमाच्या ठिकाणी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक तुषार काकडे हे नागरिकांमध्ये जाऊन बसल्याचे कार्यकर्त्यांना दिसले. राज्यातील अनेक भागात मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक खासदार, आमदार आणि मंत्र्यांच्या कार्यक्रमांना विरोध दर्शवित आहेत. त्यामुळे आयोजकांनी तुषार काकडे यांना बाहेर जाण्यास सांगितले.यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना तुषार काकडे म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला ४० दिवसांची मुदत दिली होती. मात्र कोणत्याही प्रकारचा निर्णय राज्य सरकारला घेता आला नाही. त्यामुळे राज्यातील मराठा समाज अधिक आक्रमक झाला असून ठिकठिकाणी साखळी उपोषण, आंदोलन करण्यात येत आहे. अनेक गावामध्ये मंत्र्यांना बंदी घालण्यात आली आहे. तर त्याच दरम्यान आज पुण्यात धनंजय मुंडे हे कार्यक्रमासाठी येणार आहेत. त्याबाबत माहिती मिळाली. त्यामुळे मी या ठिकाणी आलो. पण आयोजक आणि पोलिसांना वाटले की, मी येथे काही करेल, त्यामुळे मला बाहेर काढले आहे. मात्र आम्ही जोवर आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागत नाही. तोपर्यंत कोणत्याही पक्षाचा नेता असो की मंत्री आम्ही त्यांचा निषेध करणार, आता कोणालाही सुट्टी नाही. असा इशारा यावेळी त्यांनी दिला.